| | |
|---|---|
| | **नियमित दरखास्त क्र. ०७/२०१९.**<br>**नथ्थु इसनाजी देवतळे (म.वा.) वि. वामन शामजी भवरे**<br>**CNR No.- MHYA180009282019.** |

**<u>निशाणी क्र. १९ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुत अर्ज हुकूमनामाधारक यांच्या वतीने यादीसोबत मा. सर्वोच्च न्यायालया समोर दाखल प्रकरणाची स्थिती दर्शक संकेतस्थळावरील प्रिंट दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. निर्णीत ऋणकोच्या वतीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करून आक्षेप नोंदविला आहे. कथन आहे की, सदर दस्तऐवज छायांकीत प्रत असून प्रमाणीत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय ? | **होकारार्थी** |
| २) | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>वादप्रश्न क्र.१ करीता</u> :–**

५. अभिलेखाचा विचार करता, प्रस्तुत दरखास्त नियमित दिवाणी दावा क्र. ३४/१९९९ मधील दि २९/०४/२००० रोजीच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी होवून

मिळणे संदर्भात आहे. नियोजीत कागदपत्रावर उभयपक्षांची नावे तसेच प्रकरण क्रमांक व स्थिती नमुद आहे. त्यावरून सदर कागदपत्र प्रस्तुत प्रकारणातील पक्षकार व वादा संबंधी आहे. वादाचे स्वरूप पाहता, उभय पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत होणे आवश्यक आहे. त्याकरीता, उभय पक्षकारांनी दाखल केलेली कागदपत्रे अभिलेखावर असणे जरूरीचे आहे. अर्ज मंजुर केल्यास निर्णीत ऋणको याचे काही एक नुकसान होणार नाही. तथापी, उभय पक्षकारास पुरावा देण्याची संधी प्राप्त होऊन वादाचे निवारण होणार आहे. या उलट, अर्ज नामंजूर झाल्यास हुकूमनामाधारकांस नैसर्गीक न्याय तत्व नाकारले जाऊन प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवीला आहे.

**<u>वादप्रश्न क्र.२ करीता</u> :–**

६. उपरोक्त उहापोह विचारात घेता अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. त्यामुळे वादाचे स्वरूप विचारात घेता, मी या मतास आहे की, अर्जाचा खर्च निर्णीत ऋणको याचेवर बसवणे योग्य व न्यायाचे आहे. सबब, न्यायदृष्टीने, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे;

## आदेश

१) हुकूमनामाधारक यांचा अर्ज निशाणी क्र.१९ मंजूर करण्यात येतो.

२) या अर्जाचा खर्च निर्णीत ऋणको याचेवर बसविण्यात यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

(अ.अ. उत्पात)

दिनांक :– ०६/०९/२०२२.

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

घाटंजी, जि. यवतमाळ.